# कृषि पणन विषयक बातम्या : जानेवारी 2023

# अडीच हजार टनांचे आंबा निर्यातीचे उद्दिष्ट

## सर्वाधिक युरोपीयन देशांत निर्यात; त्यापाठोपाठ अमेरिका, आखाती देशांचा नंबर

**गणेश कोरे** : ॲग्रोवन वृत्तसेवा



पुणे : महाराष्ट्रातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून परकीय चलन मिळावे यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने आंबा निर्यातीसाठी प्रोत्साहन दिले जाते. या वर्षीदेखील आंबा निर्यातीचे नियोजन करण्यात आले असून, नव्याने अर्जेंटिना देशात आंबा निर्यात खुली होणार असून, अमेरिकेसह विविध देशांमध्ये सुमारे अडीच हजार टन आंबा निर्यातीचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली. **पान ४ वर »**

### अमेरिकेला समुद्र मार्गे निर्यात यशस्वी

निर्यातीचा विमान मार्गे होणारा खर्च कमी करण्यासाठी पणन मंडळाने गेल्या वर्षी अमेरिकेला समुद्रमार्गे निर्यात करण्यासाठीचे प्रोटोकॉल तयार केले. या प्रोटोकॉलनुसार आंबा समुद्रमार्गे सुस्थितीतील पोहोचल्यानंतर आता या वर्षी जास्तीत जास्त निर्यातदार समुद्रमार्गे आंबा निर्यातीसाठी प्रयत्नशील असल्याचे शिंदे यांनी सांगितले. निर्यातदारांच्या मागणीनुसार प्रक्रिया सुविधांमध्ये वाढ करण्याचे प्रयत्न पणन मंडळाचे असल्याचेही ते म्हणाले.

Agrowon Dt. 30/01/2023

### ...असे आहे विविध देशांतील निर्यात नियोजन

| देश | निर्यात उद्दिष्ट (टन) |
|---|---|
| युरोपियन देश | १ हजार ५० टन |
| अमेरिका | ७०० |
| मलेशिया | ५० |
| जपान | ५० |
| दक्षिण कोरिया | ५० |
| न्यूझीलंड | ५० |
| ऑस्ट्रेलिया | २०० |
| रशिया, मॉरिशस, अर्जेंटिना | १०० |
| आखाती देश | ३५० |

# अडीच हजार टनांचे आंबा निर्यातीचे उद्दिष्ट

» पान १ वरून

महाराष्ट्रातील आंब्याला जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी विविध देशांच्या मागणीनुसार विविध आंबा निर्यात प्रक्रिया केली जाते. यासाठीचे विविध देशांचे प्रोटोकॉल तयार करण्यात येतात. या प्रोटोकॉलनुसार विविध यंत्रणा नवी मुंबई येथील वाशी या आणि जालना येथील निर्यात सुविधा केंद्रांवर राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून उभारण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने भाभा अणू संशोधन केंद्रांच्या तांत्रिक सहकार्याने विकिरण आणि उष्ण जल प्रक्रियेचा समावेश आहे.

## न्यूझीलंडमध्ये फेब्रुवारीत; अमेरिकेत एप्रिलमध्ये निर्यात

न्यूझिलंड देशाच्या निर्यातीसाठीच्या प्रोटोकॉलची तपासणी केंद्र सरकार आणि न्यूझीलंडचे इन्स्पेक्टर यांच्याद्वारे १४ ते १७ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. तर अमेरिकेसह जपान आणि दक्षिण आफ्रिकेचे इन्स्पेक्टर एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात भारतात दाखल होणार असून, ते सर्व सुविधांची पाहणी करून निर्यातीला प्रारंभ होईल, असेही दीपक शिंदे यांनी सांगितले.

Agrowon Dt. 30/01/2023

U W P

# बाजार समितीकडून 'एपीएमसी पुणे' ॲप सादर

**मार्केट यार्ड, ता. २८ : कृषी उत्पन्न बाजार समितीने 'पुणे एपीएमसी' हे ॲप सादर केले आहे. या ॲपमध्ये शेतमालाची आवक-जावकाची आणि बाजार भावाची नोंद केली जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांसह, व्यापारी, बाजार समिती आणि कामगारांना याचा फायदा होणार आहे**

प्रजासत्ताक दिनानिमित्ताने माजी पणन संचालक सुनील पवार यांच्या हस्ते आणि इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांच्या उपस्थितीत हे 'ॲप' सादर केले गेले. यावेळी समितीचे प्रशासक मधुकांत गरड हे उपस्थित होते. यावेळी कृषी पणन क्षेत्रात महाराष्ट्रातील शेतकरी, बाजार समित्या, पणनमंडळ, पणन व्यवस्था, निर्यात व्यवस्थे संदर्भात पवार यांनी केलेल्या कामाचे कौतुक म्हणून समितीच्यावतीने त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला. यावेळी कर्मचारी व व्यापारी यांच्या आरोग्यासाठी व तणाव मुक्तीसाठी नवीन व्हॉलिबॉल ग्राउंडचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले.




> या ॲपमुळे व्यवहारात पारदर्शकता येणार आहे. तसेच आलेल्या शेतमालाची बिनचूक आवक नोंद होणार आहे. यामुळे बाजार समिती सेसच्या उत्पन्नात वाढ होणार आहे.
>
> **- मधुकांत गरड,**
> प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे



**मार्केट यार्ड :** बाजार समितीकडून 'एपीएमसी पुणे' ॲप सुनील पवार यांच्या हस्ते सादर केले. यावेळी मधुकांत गरड आणि मान्यवर.

## ॲपचा असा होणार फायदा

- शेतकरी, वाहतूकदार-हुंडेकरी, तोलणार-मापाडी, आडते हे एकाच प्लॅटफॉर्मवर येणार
- शेतकरी लॉगिन करून शेतमाल, वाहतूकदार, अडत्यांची निवड करू शकतात
- शेतकरी स्वतः शेतमालाची आवक नोंद करू शकेल
- शेतकऱ्यांनी केलेली आवक वाहतूकदार तपासून कायम करेल
- तोलणार-मापाडी अडत्याकडे आलेली आवक तपासून त्याचे वजन आणि बाजार भाव यांची माहिती भरणार
- अडत्या-व्यापारी यांना शेतमालाची आवक नोंद झाल्यानंतर येणाऱ्या शेतमालाची पूर्वकल्पना येईल
- झालेल्या व्यवहाराची माहिती सर्वांनी पारदर्शकपणे उपलब्ध राहील.

Agrowon Dt. 30/01/2023

# नांदेडमधील शेतकऱ्यांनी निर्यातक्षम केळीचे उत्पादन घ्यावे

## जिल्हाधिकारी राऊत : निर्यातक्षम केळी उत्पादन व विक्री व्यवस्थापन कार्यशाळा



अभिजित राऊत

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नांदेड : जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांनी केळी पीक लागवड व त्यातील निर्यातक्षम बाबींचा सूक्ष्म अभ्यास करून केळी निर्यातीमध्ये पुढाकार घ्यावा, आपला सामाजिक,आर्थिक विकास साधावा. यासाठी शासनाकडून सर्व सहकार्य केले जाईल. नांदेड जिल्हा केळी निर्यातीमध्ये हब व्हावा, असा आशावाद जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी व्यक्त केला.

कृषी विभाग व कृषी पणन मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने निर्यातक्षम केळी उत्पादन व विक्री व्यवस्थापन कार्यशाळा नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय परिसर येथे शनिवारी (ता. २१) करण्यात आले होते. सदरील कार्यशाळेसाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर उस्फूर्त असा प्रतिसाद लाभला.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रविशंकर चलवदे यांन नांदेड जिल्ह्यातील केळी लागवड व निर्यातक्षम उत्पादनाविषयी सद्यःस्थिती, कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका विशद करून कृषी विभागातील विविध योजना व आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त तृणधान्याचे मानवी आरोग्याच्या दृष्टीने महत्व सांगितले.

जैन उद्योग समूहाचे उपाध्यक्ष के. बी. पाटील यांनी केळी पिकातील उत्तम कृषी पद्धती (गुड ॲग्रिकल्चरल प्रॅक्टिसेस), निर्यातक्षम केळीसाठी नवीन जाती, केळी पिकातील सिगाटोका, बंची टॉप ऑफ बनाना आदी रोगाबाबत घ्यावयाची काळजी व त्याचे नियंत्रणाविषयी माहिती देऊन राज्याची, देशाची केळी निर्यातीतील सध्यस्थिती, आपल्या देशास केळी निर्यातीमध्ये असणारा वाव, विविध देशातील लागवड पद्धती, निर्यातक्षम मालाची मानांकने, आदीबाबत सखोल असे मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमध्ये महादेव बर्डे - डी. जी. एम. लातूर यांनी मॅग्नेट प्रकल्पाविषयी माहिती दिली. बी. एम. डेंगळे – नेचर एक्सपोर्ट सोलुशन ॲण्ड बनाना एक्स्पर्ट यांनी केळी निर्यातीतील संधी व अडचणी संदर्भात मार्गदर्शन केले. बाळासाहेब खेमनार यांनी उत्तम कृषी पद्धती तज्ञ, संगमनेर यांनी केळी पिकासाठी उत्तम कृषी पद्धती प्रमाणपत्र कसे मिळवायचे याविषयी माहिती दिली.

जळगाव येथील प्रगतशील शेतकरी प्रेमानंद महाजन, प्रशांत महाजन यांनी निर्यातक्षम केळी उत्पादनातील अनुभव विशद केले. नांदेड जिल्ह्यातील बारड येथील केळी निर्यातदार नीलेश देशमुख यांनी निर्यातीमधील संधी, अडचणी, घ्यावयाची काळजी आणि शासन स्तरावरून होणारी मदत याविषयी माहिती दिली. केळी पिकावरील माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

Agrowon Dt. 24/01/2023

# शिरूरमध्ये आता रोज भरणार कांदा बाजार

## आवकेत वाढ झाल्याने बाजार समितीचा निर्णय

**शिरूर :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन मार्केट यार्डावर कांदा मार्केट आठवड्याच्या काही ठरावीक दिवशी चालू राहत होते. कांद्याच्या आवकेमध्ये लक्षणीय वाढ होत होती. अनेक शेतकरी, खरेदीदार वाहतूकदार यांना एकाचवेळी कांदा विक्रीसाठी आणताना अडचण होत होती. हे लक्षात घेऊन शिरूर बाजार समितीने नवीन मार्केट यार्डामध्ये कांद्याचे जाहीर लिलाव आठवड्यातील शनिवार वगळता दररोज होणार असल्याचा निर्णय घेतला आहे.

कांदा मार्केटमध्ये दररोज नवीन कांद्याची सुमारे ६५०० पिशवीची आवक होते. बुधवारी (ता. १८) चांगल्या प्रतीच्या कांद्यास १५०० ते १७५० प्रति क्विंटल याप्रमाणे दर मिळाला. परिसरातील पारनेर, श्रीगोंदा, खेड, दौंड, जुन्नर या लुक्यांतील शेतकऱ्यांनाही हे जवळचे मार्केट असल्यामुळे अनेक शेतकरी कांदा येथे विक्रीसाठी आणतात. शेतकऱ्यांसाठी ही जवळची आणि हक्काची बाजारपेठ आहे. त्यातच शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च व वेळेची मोठी बचत असल्याने तालुक्यात व परिसरात अनेक शेतकरी कांद्याची लागवड करतात. कांदा उतरविण्यासाठी प्रशस्त असे चार शेड, लाइट, स्वच्छतागृह, सीसीटीव्ही इत्यादी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उभारलेल्या आहेत. येथील कांदा टिकाऊ असून, त्यास चांगली मागणी असल्याने कर्नाटक, आंध्र प्रदेश, केरळ, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, झारखंड, आसाम, राजस्थान, दिल्ली, जम्मू-काश्मीर अशा विविध राज्यांमध्ये विक्रीसाठी पाठविला जातो.

> **“ शेतावर कांदा विक्री केलेल्या अनेक शेतकऱ्यांच्या व्यापाऱ्यांनी फसवणूक केल्याच्या तक्रारी बाजार समितीकडे येत आहेत. वजन, बाजारभाव तसेच विक्रीच्या रकमेबाबत त्यांची फसवणूक होऊ शकते. शिरूर बाजार समितीच्या नवीन मार्केट यार्डावर रविवार ते शुक्रवार दररोज सकाळी १० वाजेपर्यंत कांदा विक्रीसाठी आणावा.**
>
> – शंकर कुंभार, प्रशासक, शिरूर बाजार समिती



**शिरूर : बाजार समितीच्या मार्केट यार्डात गुरुवारी कांद्याची झालेली आवक.**

### दररोज कांद्याची सात हजार गोणी आवक

शिरूरच्या कांदा मार्केटमध्ये दररोज नवीन कांद्याची सरासरी ६५०० ते ७००० गोणी आवक होत असून, शुक्रवारी (ता. २०) चांगल्या प्रतीच्या कांद्यास १६०० ते १९०० रुपये प्रतिक्विंटल याप्रमाणे दर मिळाला.

Agrowon Dt. 22/01/2023

# सहकारातून निर्यातीला चालना

## राष्ट्रीय निर्यात सहकार सोसायटीसाठी दोन हजार कोटींचे भांडवल

**वृत्तसंस्था**, नवी दिल्ली



सहकार क्षेत्रातील संस्थांकडून तसेच कंपन्यांकडून उत्पादित होत असलेल्या वस्तूंची आणि सेवांची निर्यात मोठ्या प्रमाणावर व्हावी या उद्देशाने राष्ट्रीय निर्यात सहकार सोसायटीची घोषणा केंद्र सरकारने केली आहे. या सोसायटीच्या कामाला गती देण्यासाठी सहकार क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील पाच सहकारी संस्था एकत्र आल्या आहेत. या सोसायटीसाठी दोन कोटी रुपयांच्या प्राधिकृत भागभांडवल असणार आहे.

### भागभांडवलाची रचना

- राष्ट्रीय सहकार निर्यात सोसायटीचे एकूण प्राधिकृत भागभांडवल दोन हजार कोटी रुपये असेल
- भरणा झालेले भांडवल (पेडअप कॅपिटल) ५०० कोटी रुपयांचे आहे
- इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह किंवा इफ्को या सहकारी संस्थेचे योगदान १०० कोटी रुपये असेल
- अमूल या प्रसिद्ध ब्रँण्डअंतर्गत आपली उत्पादने बाजारात आणणाऱ्या गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन या संस्थेचे योगदान १०० कोटी रुपयांचे आहे.
- कृषी भारती कोऑपरेटिव्ह अर्थात क्रिभको या संस्थेचे भांडवल १०० कोटी रुपये आहे.
- नॅशनल अग्रीकल्चरल कोऑपरेटिव्ह फेडरेशन म्हणजे नाफेड संस्थेचे भांडवल १०० कोटी रुपये आहे.
- नॅशनल कोऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन म्हणजे एनसीडीसी या संस्थेने १०० कोटी रुपये योगदान दिले आहे.
- या पाच संस्था राष्ट्रीय सहकार निर्यात सोसायटीच्या प्रवर्तक संस्था राहणार आहेत.
- स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या सहकारी संस्थांपासून राष्ट्रीय स्तरावरील सहकारी संस्थांपर्यंतच्या सर्व सहकारी संस्था राष्ट्रीय सहकार निर्यात सोसायटीच्या सभासद होऊ शकतील.

### सोसायटी करणार काय?

- देशाच्या गरजा भागवल्यावर सहकारी क्षेत्रातील उरणारे अतिरिक्त उत्पादन निर्यात केले जाईल.
- खाद्य आणि अखाद्य उत्पादनाच्या निर्यातीला चालना देण्यात येईल.
- चालू आर्थिक वर्षात प्रत्यक्ष निर्यातीला सुरुवात होईल.
- सहकार क्षेत्रातील उत्पादनांची निर्यात करणारी सर्वात मोठी संस्था होण्याकडे पुढील दोन ते तीन वर्षे लागतील.

### सहकार क्षेत्राचे योगदान

- विविध क्षेत्रांत सहकारी संस्था काम करत आहेत.
- खतांच्या एकूण निर्मितीमध्ये सहकाराचा वाटा २८.८ टक्के आहे.
- खतांच्या वितरण उद्योगात ३५ टक्के सहकाराचा हिस्सा आहे.
- साखरेच्या उत्पादनात सहकार क्षेत्र ३०.६० टक्के योगदान देत आहे.
- दुधाच्या विक्रीयोग्य अतिरिक्त साठ्यामध्ये सहकाराचे योगदान १७.५० टक्के आहे.
- नोंदणीकृत सहकारी संस्थांची संख्या : ८.५४ लाख
- सहकारी संस्थांमध्ये सदस्यसंख्या : २९ कोटी
- कृषी, फलोत्पादन, दुग्धोत्पादन, कुक्कुटपालान, पशुपालन, मत्स्योद्योग, सुगंधोत्पादन, साखर, मसाले, हस्तकला, वस्त्रे, चहा-कॉफी, आयुर्वेदिक उत्पादने अशा क्षेत्रांत सहकारी तत्त्वावर उत्पादन घेतले जात आहे.

Dt. 20/01/2023

अॅग्रोवन Dt. 19/01/2023

# पेरू, सीताफळ, ड्रॅगन फ्रूट निर्यातीसाठी नोंदणीची सुविधा

## कृषी विभागाच्या आग्रहानंतर 'अपेडा'चा निर्णय; उत्पादकांना लाभ

**विनोद इंगोले : अॅग्रोवन वृत्तसेवा**

नागपूर : राज्यात पेरू, सीताफळ आणि ड्रगन फ्रूट या फळपिकांखालील लागवड क्षेत्राचा विस्तार वाढता आहे. त्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाने 'अपेडा'शी पत्रव्यवहार करीत हॉर्टनेट विभागातील अन्य फळ (अदर फ्रूट) श्रेणीत या फळांचा समावेश करण्यात यश मिळविले आहे. राज्यातील निर्यातक्षम फलोत्पादकांना याचा मोठा फायदा होणार असल्याची माहिती कृषी पणन तज्ज्ञ गोविंद हांडे यांनी दिली.

रेसिड्यू फ्री किंवा चांगल्या प्रतीचा शेतीमाल उत्पादक असणाऱ्या भाजीपाला, फळ तसेच इतर प्रकारचा शेतीमाल उत्पादकांना नोंदणीची सुविधा 'अपेडा'ने आपल्या पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध करून दिली आहे. त्यामध्ये द्राक्ष उत्पादक ग्रेपनेट, खाण्याची पाने, कांदा, संत्रा, मोसंबी, लिंबू, भाजीपाला, डाळिंब अशा उत्पादनांचा समावेश आहे. हॉर्टनेट अंतर्गत असलेल्या अन्य फळे श्रेणीत आतापर्यंत तब्बल सात फळांचा समावेश करण्यात आला होता. बेर, लिची, अननस, वॉटरचेस्टनट, वूड ॲपल (कवठ), केळी, जांभूळ या सात फळपीक उत्पादकांनाच यापूर्वी नोंदणी करता येत होती. आता मात्र पेरू, सीताफळ आणि ड्रॅगन फ्रूट या तीन नव्या फळपिकांचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

**पेरू, सीताफळ, ड्रॅगन फ्रूट या तीन नव्या पिकांचा अंतर्भाव अन्य फळ श्रेणीत करण्यात आला आहे. परिणामी, या बागायतदारांना नोंदणी करता येईल. देशांतर्गत व देशाबाहेरील खरेदीदारांना दर्जेदार फळ उत्पादकांची माहिती उपलब्ध होण्यास मदत मिळेल. निर्यातीला मदत होणार आहे. याविषयी कृषी विभागाच्या माध्यमातून अपेडाकडे पाठपुरावा करण्यात आला. आता अन्य फळ श्रेणीतील फळांची संख्या दहावर पोहोचली आहे. - गोविंद हांडे,** कृषी पणन तज्ज्ञ, पुणे



परिणामी अन्य फळश्रेणीतील फळांची संख्या दहावर पोहोचली आहे. या फळपीक उत्पादकांना बागांची नोंदणी अन्य फळ श्रेणीत नोंदणी करता येणार आहे. बागांची नोंदणी करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभागाशी संपर्क साधावा लागेल. या माध्यमातून महाराष्ट्रासह देशांतर्गत चांगल्या व निर्यातक्षम प्रतीच्या फळांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा डाटाबेस उपलब्ध होणार आहे, अशी माहिती हांडे यांनी दिली.

महाराष्ट्रात मुख्यत्वे घेण्यात येणाऱ्या सात ते आठ पेरू तसेच सीताफळ वाणांची नोंद घेण्यात आली आहे. ड्रॅगन फ्रूटचे वाणांबाबतही अपेडाला कळविण्यात आले होते. या साऱ्यांची नोंद घेण्यात आल्याने कीडनाशकांचा अंशरहित (रेसिड्यू फ्री) फळ उत्पादकांना प्रमाणपत्र देणे सोयीचे होणार आहे.

Agrowon Dt. 17/01/2023

# राज्यातून आतापर्यंत ६८४ टन द्राक्ष निर्यात

## चाळीस हजार शेतकऱ्यांची नोंदणी; यंदा हंगाम उशिरा सुरू

ॲग्रोवन वृत्तसेवा



**सांगली :** यंदाच्या हंगामातील द्राक्ष निर्यातीला डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरुवात झाली आहे. राज्यातून ६८४ टन इतक्या द्राक्षाची निर्यात झाली आहे. तर सध्या सांगली जिल्ह्यातून आखाती देशात २० कंटेनर म्हणजे ३१६ टन इतकी द्राक्ष निर्यात झाली आहे. जिल्ह्यातून जानेवारीच्या अखेरपासून युरोपातील देशात द्राक्षाची निर्यात सुरू होईल, अशी माहिती कृषी विभागाने दिली आहे. **पान ४ वर »**

**“ जिल्ह्यातून द्राक्षाची निर्यात आखाती देशात सुरू झाली आहे. येत्या काळात द्राक्ष निर्यातीस गती येईल. यंदाच्या हंगामात जिल्ह्यातून द्राक्ष निर्यात करण्यासाठी शेतकरी पुढे आले असल्याने निर्यातही वाढेल.**

**– प्रकाश नागरगोजे,**
कृषी अधिकारी (निर्यात) सांगली

Agrowon Dt. 17/01/2023

# राज्यातून आतापर्यंत ६८४ टन द्राक्ष निर्यात

» पान १ वरून

जिल्ह्यातून यंदाच्या हंगामात द्राक्ष निर्यातीसाठी शेतकऱ्यांची नोंदणी अधिक होण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेतला आहे. यंदा १६ हजार शेतकऱ्यांच्या नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ९ हजार ४३१ शेतकऱ्यांनी द्राक्ष निर्यातीसाठी नोंदणी केली आहे. त्यामुळे यंदा जिल्ह्यातून द्राक्षाची निर्यात वाढेल, असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

राज्यातील ४० हजार ९४५ शेतकऱ्यांनी द्राक्ष निर्यातीसाठी नोंदणी केली आहे. राज्यातून युरोपसह आखाती देशात दरवर्षी द्राक्षाची निर्यात होते. यंदा हंगाम उशिरा सुरू झाला असला तरी, द्राक्षाची निर्यातीला विलंब झाला आहे.

**जानेवारीअखेरीस निर्यातीला गती**

सध्या राज्यातील नाशिक, सांगली या जिल्ह्यांतून आखाती देशात द्राक्षाची निर्यात होवू लागली आहे. जानेवारी महिन्याच्या अखेरीस निर्यातीला गती येणार आहे.

## राज्यातील निर्यात दृष्टिक्षेपात

| देश | कंटेनर | टन |
|---|---|---|
| नेदरलॅन्ड | ४७ | ६०३.७७८ |
| लाटव्हिया | २ | २७.८५० |
| रोमानिया | २ | २६.८५० |
| स्वीडन | २ | २६.००० |
| एकूण | ५३ | ६८४.४७८ |

**द्राक्ष निर्यातीसाठी ४० हजार शेतकऱ्यांची नोंदणी**

महाराष्ट्र आणि कर्नाटकातून होणाऱ्या द्राक्ष निर्यातीसाठी ४१०२५ शेतकऱ्यांनी नोंद केली आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील ४० हजार ९४५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून कर्नाटकातील ८० शेतकऱ्यांनी द्राक्ष निर्यातीसाठी पुढे आले आहेत. सध्या महाराष्ट्रातून नेदरलॅन्ड, लाटव्हिया, रोमानिया, स्वीडन या देशात द्राक्षाची निर्यात सुरू झाली आहे. आतापर्यंत ५३ कंटनेर म्हणजे ६८४.४७९ टन द्राक्षाची निर्यात झाली असल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे.

# शेतीमाल निर्यातीत नेतृत्वाची संधी

**अपेडाने शेतीमाल आणि प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्यातीत जागतिक पातळीवर भारताला नेतृत्व कसे करता येईल, असे उद्दिष्ट ठेवून निर्यातीचा कार्यक्रम आखला पाहिजे.**

यंदाच्या एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांत शेतीमाल तसेच प्रक्रिया केलेल्या खाद्य पदार्थांची निर्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १६ टक्क्यांनी वाढली आहे. गेल्यावर्षी एप्रिल ते नोव्हेंबर या काळात शेतीमाल निर्यात १५ अब्ज डॉलर होती, ती आता साडे सतरा अब्ज डॉलर झाली आहे. असे असले तरी गेल्यावर्षी पहिल्या आठ महिन्यांत कृषी आणि प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्यात २२.१ टक्क्यांनी वाढली होती. त्या वाढीच्या तुलनेत यंदाची निर्यात वाढ कमीच म्हणावी लागेल. गेल्यावर्षी कोरोना लॉकडाउन तसेच रशिया-युक्रेन युद्धाचा प्रभाव आयात-निर्यातीवर होता. असे असताना निर्यातीचा टक्का अधिक होता. गहू बासमती तांदूळ, बिगर बासमती तांदूळ, ताज्या फळे-भाजीपाला, प्रक्रियायुक्त पदार्थ तसेच डेअरी आणि पोल्ट्री प्रॉडक्ट्स अशा सर्वांमध्येच निर्यातीत वाढ आहे. मागील काही दिवसांपासून संपूर्ण जगाला अन्नसुरक्षा सतावते आहे. बहुतांश शेतीमाल उत्पादक देशांनी निर्यातीसाठी हात आखडता घेतला आहे. अन्नसुरक्षेसाठी खाद्यान्नाचा साठा करून ठेवण्याकडे त्यांचा कल दिसतो. नैसर्गिक आपत्तींमध्ये पिकांचे वाढते नुकसान आणि युद्धामुळे विस्कळीत झालेली आयात-निर्यात ही त्यामागची कारणे आहेत. अशा परिस्थितीत आपली खाद्यान्न निर्यात वाढत असल्यास त्याचे स्वागतच करायला पाहिजे. वाढत्या निर्यातीची ही सगळी किमया उत्पादक शेतकरी, प्रक्रिया उद्योजक, निर्यातदार, पणन विभाग, अपेडा असा सर्वांची आहे, हेही मान्य करावे लागेल.

शेतीमाल तसेच प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्यातवाढीसाठी अपेडा प्रयत्नशील असले तरी अजूनही देशातून अपेक्षित निर्यात होत नाही. कोरोना महामारी तसेच रशिया-युक्रेन युद्ध पश्चात भारतातील गहू, तांदूळ अशा खाद्यान्नासह ताजा भाजीपाला-फळे, अन् प्रक्रियायुक्त पदार्थांना जगभरातून मागणी वाढतेय. त्यामुळे असे सर्व पदार्थ जगभर पोहोचविण्याची एक चांगली संधी भारताकडे आहे. अमेरिका, युरोपच्या तुलनेत आपण शेतीमाल प्रक्रियेत खूप मागे आहोत. टाकाऊ शेतीमालावरच प्रक्रिया केली पाहिजेत, या मानसिकतेतून उद्योजकांनी आता बाहेर पडायला हवे. प्रीमियम क्वालिटीचा माल प्रक्रियेसाठी वापरला गेला पाहिजेत. शिवाय प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी भांडवली गुंतवणुकीबरोबर खेळते भांडवल पण बँकांनी द्यायला हवे. असे झाले तरच शेतीमालावर प्रक्रियेत आपला टक्का वाढणार आहे. अपेडाने शेतीमाल आणि प्रक्रियायुक्त पदार्थांच्या निर्यातीत जागतिक पातळीवर भारताला नेतृत्व कसे करता येईल, असे उद्दिष्ट ठेवून निर्यातीचा कार्यक्रम आखला पाहिजे. त्याला केंद्रीय कृषी तसेच वाणिज्य-व्यापार मंत्रालयाची चांगली साथ लाभायला हवी. मागील काही वर्षांपासून अन्नधान्य तुटवडा तसेच वाढत्या महागाईच्या भीतीने शेतीमालावर निर्यात निर्बंध लादले जात आहेत. त्यामुळे निर्यातीला ब्रेक लागत आहे. अपेडासह शेतीमाल निर्यातीसंबंधी केंद्रातील सर्व मंत्रालयाने जगभरातील नवनव्या बाजारपेठा शोधून तेथे आपला शेतीमाल, प्रक्रियायुक्त पदार्थ कसे पोहोचतील, हे पाहायला हवे. सेंद्रिय अथवा रसायन अवशेषमुक्त शेतीमाल, भौगोलिक मानांकन (जीआय) असलेला शेतीमाल त्याचबरोबर आता आपली पौष्टिक भरडधान्य आणि या सर्वांचे प्रक्रियायुक्त पदार्थ यांनी देखील प्रचंड मागणी आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण शेतीमालाचे स्वतंत्र ब्रॅण्डने जगभर पोहोचविण्याचे नियोजन करायला हवे. निर्यातीतील सातत्यामुळे शेतीमालास चांगला दर मिळतो. देशांतर्गत बाजारात दर टिकून राहतात. देशाला परकीय चलन मिळते. जगभर खात्रीशीर निर्यातदार देश म्हणून आपण नावारूपाला येऊ शकतो. शेतीमाल प्रक्रिया असो की निर्यात त्यात शेतकऱ्यांचा, उत्पादक कंपन्यांचा सहभाग वाढला पाहिजेत. असे झाले तर शेतीमाल प्रक्रिया तसेच निर्यातीचा थेट लाभ शेतकऱ्यांच्या पदरात पडणार आहे.

Agrowon Dt. 13/01/2023

Agrowon Dt. 10/01/2023

# राज्यातील बाजार समित्यांचे वार्षिक उत्पन्न १२४ कोटींवर

## सोलापूर पहिली, लातूर दुसरी, पिंपळगाव बसवंत समिती राज्यात तिसरी

मुकुंद पिंगळे : ॲग्रोवन वृत्तसेवा



**नाशिक : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या अखत्यारित राज्यात ३०६ बाजार समित्या कार्यरत आहेत. त्यामध्ये २०२१-२२ या आर्थिक वर्षात २९५ बाजार समित्यांनी वार्षिक उत्पन्नाची माहिती पणन मंडळाला सादर केली होती. त्यानुसार राज्यात ९२४ कोटी ३ लाख १२ हजार ६६७ रुपये वार्षिक उत्पन्न मिळविले आहे.**

निफाड विधानसभा मतदार संघाचे आमदार दिलीप बनकर यांनी २०२१-२२ या आर्थिक वर्षात राज्यातील बाजार समित्यांना मिळालेल्या उत्पन्नाबाबतची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. पणन मंडळाच्या कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार मर्यादित कार्यक्षेत्र असलेल्या बाजार समित्यांमध्ये सोलापूर बाजार समिती अव्वल ठरली आहे. दुसऱ्या क्रमांकावर लातूर तर तिसऱ्या स्थानावर पिंपळगाव बसवंत आहे.

राज्यातील एकूण २९५ बाजार समित्यांच्या आर्थिक उत्पन्नात राज्यातील प्रादेशिक बाजार समितीत १०१ कोटी ५८ लाख उत्पन्न मिळवीत मुंबई पहिली, ७६ कोटी १० लाख उत्पन्न मिळवीत पुणे दुसरी, तर ३० कोटी ३० लाख उत्पन्न मिळवीत नागपूर तिसरी याप्रमाणे त्या वरचढ ठरल्या आहेत. बार्शी, जुन्नर या बाजार समित्यांचे उत्पन्न १० कोटींवर आहे.

३०६ बाजार समित्यांपैकी २९५ समित्यांची उत्पन्न-खर्चाची माहिती पणन मंडळाला प्राप्त झाली. पत्रास उत्तर देतेवेळी राज्यातील ११ बाजार समित्यांची माहिती अद्याप प्रलंबित होती. त्यामध्ये मुळशी (जि. पुणे), सिरसम (जि. हिंगोली), परळीवैजनाथ (जि. बीड), जळकोट (जि. लातूर),

पान ४ वर »

### मोठ्या बाजार समित्यांची उत्पन्न स्थिती

| बाजार समिती | उत्पन्न (रुपये) |
|---|---|
| मुंबई | १०१.५८ कोटी |
| पुणे | ७६.१० कोटी |
| नागपूर | ३०.३० कोटी |

# राज्यातील बाजार समित्यांचे वार्षिक उत्पन्न ९२४ कोटींवर

Agrowon
Dt. 10/01/2023

» पान १ वरून

देगलूर (जि. नांदेड), किनवट (जि. नांदेड), हिमायतनगर (जि. नांदेड), भूम (जि. उस्मानाबाद), लोहारा (जि. उस्मानाबाद), परंडा (जि. उस्मानाबाद), वाशी (जि. उस्मानाबाद) यांची आर्थिकपत्रके त्या वेळी अप्राप्त होती. त्यामुळे ९२४ कोटींवर हे वार्षिक उत्पन्न होते. ही माहिती प्राप्त झाल्यास उत्पन्न वाढीसह अंतिम आकडा समोर येईल.

**उत्तर महाराष्ट्रात पिंपळगाव बसवंत 'नंबर एक'**

२०२१-२२ वर्षात ६५,८२,५७४ क्विंटल कांदा आवक झाली असून १,७१,६०,४५० क्रेट्स टोमॅटो आवक झाली आहे. या व्यतिरिक्त धान्य, भाजीपाला, बेदाणा, डाळिंब यांची मोठ्या प्रमाणावर आवक होत असल्याने बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. त्यामुळे बाजार समितीने राज्यात तिसरा, तर नाशिक विभागात पहिला नंबर मिळविला आहे. बाजार समितीचे कार्यक्षेत्र निफाड तालुक्यातील ६९ गावांचे असून, २७ वर्षांपूर्वी २८ डिसेंबर १९९५ रोजी स्थापन झाली असून, आमदार बनकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाजार समितीच्या माध्यमातून दिलेल्या विविध सोयी-सुविधा, रोख व्यवहार, शेतकरी हिताला प्राधान्य दिल्याने अल्पावधीतच या बाजार समितीने राज्यात व देशात नावलौकिक मिळविला आहे. बाजार समितीचे मालकीची १५७ एकर जमीन आहे. विविध विकासकामे, सामाजिक दायित्व जपत ४२ कोटींच्या ठेवी शिल्लक आहेत. बाजार समितीवर एक रुपयाचेही कर्ज नसल्याची माहिती आमदार दिलीप बनकर यांनी दिली.

## वार्षिक उत्पन्नात राज्यातील टॉपटेन बाजार समित्या

| बाजार समिती | वार्षिक उत्पन्न (कोटींत) |
|---|---|
| सोलापूर | २५,२०,४१,७१७ |
| लातूर | २४,२०,८४,२९६ |
| पिंपळगाव बसवंत | २१,९६,८७,२४८ |
| लासलगाव | १९,३५,३७,४९४ |
| अमरावती | १७,८१,९५,३४४ |
| कोल्हापूर | १६,५८,७१,१२० |
| नाशिक | १६,२०,०४,६६५ |
| खामगाव | १५,४७,२२,९९३ |
| अहमदनगर | १४,९६,१२,०१० |
| हिंगणघाट | १४,१२,५४,२१३ |

(संदर्भ : पणन मंडळाने आमदार बनकर यांना दिलेले पत्र)

पुणे, गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३

सकाळ ॲग्रोवन

# केळी उत्पादन, हाताळणी, प्रक्रियेवर उद्या कार्यशाळा

## 'मॅग्नेट' आणि ॲग्रोवन फार्म डीएम यांचा पुढाकार

ADB FarmDM AGROWON

ॲग्रोवन वृत्तसेवा

सोलापूर : राज्याच्या सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागांतर्गत आशियायी विकास बँक अर्थसाह्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नैटवर्क प्रकल्प (मॅग्नेट), राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे आणि ॲग्रोवन फार्म डीएम यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या (ता. १०) गुरसाळे (ता. माळशिरस) येथे 'केळी-पीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी व प्रक्रिये'संबंधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरसाळे येथील 'ॲग्रोवन फार्म्स'वर सकाळी १० वाजता सहकार आणि पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे आणि 'ॲग्रोवन'चे संपादक- संचालक आदिनाथ चव्हाण यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचे उद्घाटन होईल. त्यानंतर टिश्युकल्चर केळी तज्ज्ञ संदीप जाधव, केळी निर्यातदार अझहर पठाण आणि प्रगतिशील शेतकरी कपिल जाचक हे तांत्रिक मार्गदर्शन करतील. केळी उत्पादन, पीक हाताळणी, साठवणूक, विक्री इत्यादीसाठी मॅग्नेट प्रकल्पांतर्गत विविध योजना कार्यान्वित आहेत. याशिवाय गुणवत्ता, गॅप प्रमाणीकरणातील अडचणींच्या निवारण होण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वाची आहे. याकरिताचे प्रवेश मर्यादित असून, येथे नोंदणी आवश्यक आहे. नोंदणीकरिता संपर्क : ज्ञानेश थोरात - ९६२३५३३०६९, संदेश कुलकर्णी- ९९२२८१९९२०. कार्यशाळेसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

### केळी फार्म भेट, पुस्तक प्रकाशन

ॲग्रोवन फार्ममधल्या केळी पिकाच्या सुगीपश्चात तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेण्याची संधी शेतकऱ्यांना या वेळी मिळणार आहे. तसेच 'मॅग्नेट'च्या वतीने केळीवरील संपूर्ण माहिती असणाऱ्या केळी पीक माहिती पुस्तिकेचे प्रकाशन उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे.

Agrowon Dt. 06/01/2023

# डाळिंब निर्यातीसाठी देशातून चार हजार शेतकऱ्यांची नोंदणी

## ‘अपेडा’वर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सर्वाधिक पुढाकार

**अभिजित डाके :** ॲग्रोवन वृत्तसेवा



सांगली : यंदाच्या डाळिंब हंगामाला पावसाचा अडसर ठरला असला, तरी देशातून डाळिंब निर्यातीसाठी शेतकरी पुढे आले असल्याचे चित्र आहे. देशातून आतापर्यंत ४ हजार ७१४ शेतकऱ्यांनी डाळिंब निर्यातीसाठी अपेडावर (कृषी उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण) नोंदणी केली असल्याची माहिती डाळिंब संघाच्या सूत्रांनी दिली आहे.

देशातील आंध्र प्रदेश, गुजरात, कर्नाटक आणि महाराष्ट्रातून डाळिंब युरोपसह अन्य देशात डाळिंबाची निर्यात केली जाते. गतवर्षी देशातून २४०० शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. यंदाच्या हंगामात देशातून डाळिंब युरोपसह आखाती देशात डाळिंबाची निर्यात करण्यासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी सुरू केली असल्याचे चित्र आहे. दरम्यान, गेल्या वर्षी गुजरात राज्यातून २१ शेतकरी डाळिंब निर्यातीसाठी पुढे आले होते. मात्र यंदाच्या हंगामात गुजरात राज्यातून डाळिंब निर्यातीसाठी शेतकऱ्यांनी पाठ फिरवली असल्याचे दिसते आहे. पान ४ वर »

### राज्यनिहाय डाळिंब निर्यातीसाठी झालेली नोंदणी

| राज्य | नूतनीकरण | नवीन | एकूण |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ४६५ | ४१७० | ४६३५ |
| आंध्र प्रदेश | ००० | ३८ | ३८ |
| कर्नाटक | ००० | ११ | ११ |
| तेलंगणा | ७ | २३ | ३० |
| एकूण | ४७२ | ४२४७ | ४७१४ |

Agrowon Dt. 06/01/2023

# डाळिंब निर्यातीसाठी देशातून चार हजार शेतकऱ्यांची नोंदणी

» पान १ वरून

दरम्यान, यंदाच्या डाळिंब बागांचा हंगाम धरण्यापासून डाळिंबाला पोषक असे वातावरण होते. मात्र त्यानंतर फुलकळी, लिंबू आकाराचे फळ असताना देशातील विविध भागात पावसाने हजेरी लावली. त्याचा परिणाम डाळिंब सेटिंग होण्यावर झाला. त्यातच तेलकट, कुजवा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने हा पाऊस डाळिंब हंगामाला अडसर ठरला आहे. त्यामुळे यंदाच्या हंगामात डाळिंबाची निर्यात होण्याची शक्यता नसल्याचे डाळिंब उत्पादक शेतकरी सांगत आहेत.

डाळिंब उत्पादक शेतकरी काटेकोर नियोजन करत डाळिंबाच्या बागा साधत असल्याचे चित्र आहे. आतापर्यंत देशातून डाळिंब निर्यात करण्यासाठी ४ हजार ४१७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षी देशातून डाळिंब निर्यात करण्यासाठी २ हजार ४३२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली केली होती. मात्र गेल्या वर्षीदेखील डाळिंबाला पावसाचा फटका बसला होता. त्यामुळे डाळिंब युरोपसह आखाती देशात निर्यात घटली होती. यंदा डाळिंब निर्यात करण्यासाठी शेतकरी संख्या वाढली असली तरी दर्जेदार रेसिड्यू फ्री डाळिंबाचे उत्पादन घटल्याने युरोपसह अन्य आखाती देशात निर्यातीत मोठी घट होईल, असा अंदाज व्यक्त केला आहे.

### गुजरातमधून यंदा डाळिंबाची निर्यात नाही

गुजरात राज्यातून दरवर्षी डाळिंबाची निर्यात होते. यंदाच्या हंगामात राज्यातील डाळिंबाला फटका बसला. यामुळे फुलोरावस्थेत असलेल्या डाळिंबाचे सेटिंग झाले नसल्याने सुमारे ५० टक्के बागांचे नुकसान झाले आहे. परिणामी, यंदाच्या हंगामात गुजरातमधून डाळिंब निर्यातीसाठी शेतकरी पुढे आले नाहीत. त्यामुळे यंदाच्या हंगामात गुजरात राज्यातून डाळिंबाची निर्यात होणार नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

Pudhari Dt. 03/01/2023

# कृषी उत्पादनाच्या निर्यातीत १६ टक्क्यांची वाढ

- नोव्हेंबरअखेर १७.४३ बिलियन डॉलरची निर्यात
- निर्यातीत फळे, भाजीपाला, अन्नधान्य, पोल्ट्री व डेअरी उत्पादनांचा समावेश

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

चालूवर्षी पावसाने योग्यवेळी हजेरी लावून सर्वत्र समाधानकारक वृष्टी केल्यामुळे देशाच्या अन्नधान्य उत्पादनामध्ये चांगली वृद्धी दिसतानाच कृषी आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांच्या निर्यातीमध्येही १६ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या आठमाहीमध्ये झालेली ही वाढ लक्षात घेता या क्षेत्रातील निर्यात अर्थसंकल्पिय उद्दिष्ट सहजगत्या पार पाडेल आणि या क्षेत्रात नवा विक्रमही प्रस्थापित होऊ शकतो.

केंद्रीय अन्न मंत्रालयाने नुकतीच यांविषयीची माहिती जाहीर केली आहे. यानुसार चालू अर्थसंकल्पिय वर्षामध्ये कृषी आणि प्रक्रिया केलेल्या अन्नाधान्याच्या निर्यातीसाठी २३.५६ बिलियन डॉलर इतके निर्यातीचे उद्दिष्ट निर्धारित केले होते. गतवर्षी एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांच्या कालावधीमध्ये १५.०७ बिलियन डॉलर इतक्या रकमेच्या झालेल्या निर्यातीच्या तुलनेत चालूवर्षी ही निर्यात १७.४३ बिलियन डॉलर इतकी झाली आहे. यामध्ये प्रक्रिया केलेली फळे आणि भाज्या यांच्या निर्यातीमध्ये तब्बल ३२.६० टक्क्यांची वाढ दिसून आली आहे; तर ताज्या फळांच्या निर्यातीत गतवर्षीच्या तुलनेत ४ टक्क्यांची वाढ दिसते आहे.

> शेतकरी, निर्यातदार आणि प्रक्रिया करणारे उद्योग यांनी याविषयी कटाक्षाने सूचनांचे पालन केल्याने आपण हे उद्दिष्ट साध्य करू शकलो.
>
> **- एम. अनगामुथ्थू,** अध्यक्ष, कृषी अन्नपदार्थ निर्यात विकास प्राधिकरण

प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांमध्ये तृणधान्य आणि अन्य कडधान्यांच्या निर्यातीमध्ये २८.२९ टक्क्यांची वाढ आहे; तर डाळी, पोल्ट्री प्रॉडक्टस्, दुग्धजन्य पदार्थ आणि गहू यांच्या निर्यातीमध्ये अनुक्रमे ९०.४९, ३९.२६, ८८.४५, ३३.७७ आणि २९.२९ टक्के वाढ नोंदविली गेली आहे.

Agrowon Dt. 02/01/2023

# खाद्यान्न निर्यातीत १६ टक्के वाढ

## शेतीमाल व्यापार : साडेसतरा अब्ज डॉलरची निर्यात

**मुंबई :** यंदाच्या एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांत देशातून शेतीमाल आणि प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांची निर्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १६ टक्क्यांनी वाढली आहे. या काळात ही निर्यात साडेसतरा अब्ज डॉलर एवढी झाल्याची माहिती केंद्रीय व्यापार मंत्रालयाने दिली आहे.

गेल्या वर्षीच्या एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांत ही निर्यात १५ अब्ज डॉलर होती. मार्च २०२३ मध्ये संपणाऱ्या आर्थिक वर्षात ठरवलेल्या एकूण लक्ष्याच्या ७४ टक्के निर्यात (साडेसतरा अब्ज डॉलर) या आठ महिन्यातच झाली आहे. या पूर्ण आर्थिक वर्षासाठी साडेतेवीस अब्ज डॉलर मूल्याच्या कृषी व प्रक्रिया केलेल्या खाद्यान्न निर्यातीचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

प्रक्रिया केलेली फळे व भाज्या यांच्या निर्यातीत या आठ महिन्यात साडेबत्तीस टक्के वाढ झाली. तर ताज्या फळांच्या निर्यातीत गेल्या वर्षीच्या आठ महिन्यांपेक्षा (९५ कोटी डॉलर) या आठ महिन्यांमध्ये चार टक्के वाढ (९९ कोटी डॉलर) झाली आहे. प्रक्रिया केलेल्या फळांची या आठ महिन्यातील निर्यात १३१ कोटी डॉलर एवढी आहे. ती मागील वर्षीच्या आठ महिन्यात ९८ कोटी डॉलर एवढी होती.

> **शेतकरी, निर्यातदार, प्रक्रिया उद्योजक आदी सर्व लाभधारकांबरोबर सतत प्रयत्न करून खाद्यपदार्थांवर दर्जेदार प्रक्रिया व्हावी आणि गुणवत्तापूर्ण सामुग्री निर्यात व्हावी याची काळजी आम्ही घेतली. त्याचप्रमाणे निर्यातीसाठी नव्या बाजारपेठाही शोधून काढल्या.**
>
> **- एम. अंगमुथ्थु,** अध्यक्ष, अपेडा

### वाढीचा तपशील (टक्क्यांमध्ये)

| | |
|---|---|
| पोल्ट्री प्रॉडक्ट | ८८ |
| डेअरी प्रोडक्ट | ३७ |
| गहू | २९ (११६ कोटींवरून १५० कोटी डॉलर) |
| बासमती तांदूळ | ४० (२०६ कोटींवरून २८७ कोटी डॉलर) |
| बिगर बासमती तांदूळ | ५ (३९३ कोटींवरून ४१० कोटी डॉलर) |

### अपेडामुळे निर्यातवाढ

मुख्यतः ॲग्रीकल्चर अँड प्रोसेस्ड प्रॉडक्ट एक्सपोर्ट डेव्हलपमेंट ॲथॉरिटीतर्फे (अपेडा) केलेल्या प्रयत्नांमुळे ही निर्यात वाढल्याचे सांगितले जात आहे. विशिष्ट शेतीमाल व खाद्यान्नाच्या निर्यातवाढीसाठी वेगवेगळ्या देशांमध्ये प्रदर्शने भरवणे, आखाती देशांमधील संभाव्य खरेदीदार व भारतीय निर्यातदारांच्या दृक्‌श्राव्य माध्यमांमधून बैठका, परदेशांमधील भारतीय वकिलातींसह केलेले प्रयत्न यामुळे निर्यातवाढ झाली.

# शेतमाल विक्रीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

स्पर्धेच्या युगात शेतमाल विक्रीसाठी शेतकरी व सरकारकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. यातून शेतमालास बरा भाव मिळत आहे. पण अजूनही मोठ्या बदलांची गरज आहे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारने धोरण बदलण्याची व त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याची आवश्यकता आहे. तरच शेतकरी व अर्थव्यवस्था सक्षम होईल.

-डॉ. सुभाष घुले, उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य
कृषि पणन मंडळ, कोल्हापूर विभाग



भारतातील ५० टक्केपेक्षा जादा लोकसंख्या शेती व शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून आहे. महाराष्ट्रात २३० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र पिकाखाली आहे. यापैकी ८० ते ८२ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. १८ ते २० टक्के क्षेत्र बागायती आहे. राज्यातील ६ कोटी जनता ग्रामीण, तर ५ कोटी जनता शहरी भागात आहे. राज्यातील अर्थव्यवस्थेत १५ टक्के हिस्सा कृषी क्षेत्राचा आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण भागात शेतकरी उत्पादित केलेला शेतमाल घरी खाण्यासाठी वापरत होते. शिल्लक शेतमाल इतर लोकांना देऊन त्यांच्याकडून आवश्यक असलेल्या वस्तू घेत होते. नंतरच्या काळात शेतकरी शेतमाल जवळच्या बाजारपेठांमध्ये आणून विक्री करू लागले. तेथे त्यांना खरेदीदार सांगेल त्या किमतीत विक्री करावी लागत असे. यामुळे शेतमालास योग्य भाव मिळत नसे.

१८८६ मध्ये अकोला जिल्ह्यात देशातील पहिल्या बाजार समितीची स्थापना झाली. १८९७ मध्ये 'कापूस व धान्य पणन कायदा' अस्तित्वात आला. त्यानंतर १९२७ मध्ये 'मुंबई कापूस पणन कायदा' अस्तित्वात आला. केंद्र शासनाच्या अखत्यारित सन १९३५ मध्ये 'डायरेक्टर मार्केटिंग आणि इन्स्पेक्शन' ची स्थापना झाली.

स्वातंत्र्यानंतर पंचायतराज व्यवस्था अंमलात आली. महात्मा गांधीजींनी 'खेड्याकडे चला' ही घोषणा केली. यानंतर पंचवार्षिक योजना कार्यान्वित झाली. प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये शेतकरी हा घटक केंद्रस्थानी ठेऊन काही सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. यामध्ये राज्यात कृषी उत्पन्न बाजार समित्यांची निर्मिती हा एक भाग आहे. महाराष्ट्रात बाजार समित्यांच्या नियंत्रणासाठी 'महाराष्ट्र कृषी उत्पादन खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३' हा कायदा अस्तित्वात आला. बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल विक्री करता येईल व चांगला दर मिळेल, हे अपेक्षित होते. तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक शेती संबंधित लागणारे सर्व साहित्य समितीच्या आवारात उपलब्ध होऊ लागले.

राज्यात समित्यांमुळे शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाली. समितीमध्ये खरेदीदारांची संख्या वाढल्याने स्पर्धा निर्माण झाली. शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्यास मदत झाली. शेतमालाच्या विक्रीमुळे बाजार समित्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली. त्यामुळे काही प्रमाणात पायाभूत सुविधा बाजार आवारामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या. केंद्र शासनाच्या माध्यमातून डायरेक्टर मार्केटिंग व इन्स्पेक्शनकडून बाजार समित्यांनी शेतमालाच्या विक्रीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात यासाठी २५ टक्के अनुदानाची योजना कार्यान्वित केली. आजमितीस राज्यात ३०५ मुख्य बाजार व ६२४ उपबाजार आहेत. राज्यात असलेल्या बाजार समित्यांमध्ये २०२०-२१ मध्ये रक्कम ५०,९९० कोटींची उलाढाल झाली. राज्यातील १०८ बाजार समित्यांमध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत प्रत्येकी १००० टन क्षमतेची गोदामे उभारणीचे काम कार्यान्वित केले आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घेता येतो. तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत ३२ समित्यांमध्ये व ई-नाम अंतर्गत २७ समित्यांमध्ये धान्य चाळणी यंत्र बसविण्यात आले आहे. यातून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाचे मूल्यवर्धन करून योग्य मोबदला मिळण्यास मदत होत आहे.

राज्यातील बऱ्याच समित्यांमध्ये कृषि पणन मंडळाच्या माध्यमातून टिकरबोर्ड बसविले आहे. यामुळे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना विविध बाजार समित्यांमध्ये होणाऱ्या शेतमालाची आवक व दराविषयची माहिती मिळण्यास मदत होत आहे. अलिकडे केंद्र शासन देशात खरीप व रब्बी हंगामात उत्पादित होणाऱ्या २१ प्रकारच्या शेतमालाच्या किमान आधारभूत किंमती दरवर्षी जाहीर करू लागले.

शेतकऱ्यांना शेतमाल बाजार समिती आवारात आणून विक्री करणे बंधनकारक आहे. त्यामुळे बाजार समित्यांची मक्तेदारी झाली असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे. २००३ मध्ये पणन कायद्यामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या. यामध्ये शेतमालाची विक्री सुलभ व्हावी, शेतकऱ्यांना त्यांनी पिकविलेल्या शेतमालास योग्य मुल्य मिळावे, म्हणून शेतकरी ते ग्राहक बाजार स्थापन करण्याची तरतूद झाली. यामध्ये मार्केट या उभारणीसाठी खासगी गुंतवणूकदार आकर्षित करणे, शीतगृह व गोदामांची उभारणी, लॉजिस्टिक सुविधांचा समावेश व काढणीपश्चात मूल्यसाखळी विकसित करणे हे उद्दिष्ट होते. शेतमालाच्या विक्रीमधील मध्यस्थांची संख्या कमी करुन उत्पादक ते ग्राहक थेट विक्री होण्याच्या उद्देशाने आंध्रप्रदेशात रायतू बाजार, पंजाबमध्ये अपनी मंडी, तामिळनाडूमध्ये उजवर संधाई व महाराष्ट्रात शेतकरी आठवडे बाजार यासारखे उपक्रम सुरु झाले.

शेतमालाच्या विक्रीसाठी नवीन पर्याय उपलब्ध व्हावेत म्हणून २०१७ मध्ये केंद्र शासनाने पणन कायद्यात आमूलाग्र बदल केले. यामध्ये खासगी बाजार, एक परवाना पध्दत, थेट पणन, शेतकरी ते ग्राहक बाजार, कंत्राटी शेती, विशेष वस्तू बाजार या बाबींचा समावेश झाला. राज्यात खासगी बाजार उभारणीस मान्यता दिली. यामुळे मे २०२२ पर्यंत राज्यात ७१ खासगी बाजार सुरू झाले. या बाजारांच्या माध्यमातून ५,५०० कोटींची उलाढाल झाली. थेट पणनचे राज्यात १४४६ परवाने दिले आहेत. त्या माध्यमातून राज्यात ३,२०० कोटींपेक्षा जास्त रकमेची उलाढाल झाली. एकल परवान्याच्या माध्यमातून २०१९-२० पर्यंत ७,२०० कोटींची उलाढाल राज्यात झाली. पणन कायद्यामध्ये बदल केल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल विक्री करण्यासाठी वेगवेगळे पर्याय उपलब्ध झाले आहेत. यामुळे राज्यातील शेतमाल विक्रीच्या उलाढालीमध्ये वाढ झाली आहे.

तसेच बहुतांश वेळा शेतकरी उत्पादित केलेला शेतमाल काढणी झाल्याबरोबर बाजारपेठेत विक्री करतो. पण आवकेत वाढ झाल्यामुळे दर कमी होतात. कालांतराने दर वाढल्यानंतर व्यापारी त्याची विक्री करतात. यासंदर्भात कृषि पणन मंडळाच्या माध्यमातून बाजार समित्यांमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यास सुरवात केली आहे. या योजने अंतर्गत एकूण १७ शेतमालांचा समावेश आहे. यामध्ये तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, हरभरा, भात, करडई, ज्वारी, बाजरी, मका, गहू, वाघ्या घेवडा, बेदाणा, हळद यांचा समावेश आहे. या योजने अंतर्गत शेतमालाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्केपर्यंतची रक्कम वार्षिक व्याजदर ६ टक्केने शेतकऱ्यांना देण्यात येते. या योजनेमध्ये शेतकरी शेतमाल सहा महिने कालावधीपर्यंत ठेऊ शकतो. चालू वर्षी ६२००० क्विंटल शेतमाल या योजने अंतर्गत ठेवला आहे१८ कोटी रुपये तारण कर्ज म्हणून दिले आहे.

जगाला आवश्यक असणाऱ्या बहुतांश शेतमालाचे उत्पादन भारतात घेतले जाते. भारतातून जगातील १९५ देशांना विविध प्रकारचा शेतमाल निर्यात केला जातो. २०२१-२२ मध्ये भारतातून ११४१२.४१ कोटींची फळे व भाजीपाल्याची निर्यात झाली. त्यापैकी ५० टक्केपेक्षा जास्त रकमेची निर्यात महाराष्ट्रातून झाली आहे. राज्यात उत्पादित होणाऱ्या फळे व भाजीपाल्यास निर्यातीस चालना देण्याच्या उद्देशाने कृषी पणन मंडळाने राज्यात ४४ विविध ठिकाणी निर्यात सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. या माध्यमातून राज्यात २७१५ टन क्षमतेची शितगृहे, ६१० टन क्षमतेची प्रशितकरण, १८० टन क्षमतेची रायपनिंग चेंबर्सची उभारणी केली आहे. या सुविधा केंद्राच्या उभारणीमुळे राज्यात उत्पादित होणारा वेगवेगळ्या प्रकारचे फळे व भाजीपाला निर्यात होण्यास मदत झाली आहे. नवी मुंबई, वाशी येथे वेपरहीट ट्रिटमेंट प्रकल्पाची उभारणी केली आहे. सदर ठिकाणाहून युरोप, जपान, न्युझीलंड, दक्षिण कोरिया, रशिया व मॉरिशस या देशांमध्ये १५०० टन आंब्याची निर्यात झाली आहे. विकिरण सुविधा केंद्र, वाशी मुंबई येथून अमेरिका व ऑस्ट्रेलिया या देशांना ४००० टन आंब्याची निर्यात झाली. सदर सुविधा केंद्रांचा वापर करून २ लाख टनापेक्षा जास्त शेतमालाची निर्यात झाली आहे. राज्यातील वैयक्तिक शेतकरी, सहकारी संस्था, शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्या या निर्यातदार झाल्या पाहिजेत, या उद्देशाने कृषी पणन मंडळाने प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाच दिवसाचा हॉर्टिकल्चर एक्स्पोर्ट ट्रेनिंग कोर्स सुरु केलेला आहे. या कोर्सद्वारे आतापर्यंत २००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. सुमारे ४०० पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थींचा प्रत्यक्ष निर्यातीमध्ये सहभाग घेतला आहे.

महाराष्ट्र हे विविध भागामध्ये उत्पादित होणाऱ्या विशेष शेतमालासाठी प्रसिध्द आहे. या शेतमालांची ओळख जगभरात होण्यासाठी भौगोलिक मानांकनाची मदत झाली आहे. राज्यातील विविध २६ शेतमालास भौगोलिक मानांकन प्राप्त झालेले आहे. यामध्ये हापूस आंबा, मराठवाडा केशर आंबा, नाशिक द्राक्ष, सांगली हळद, पुरंदर अंजीर, आजरा घनसाळ, कोल्हापुरी गुळ, वाघ्या घेवडा, महाबळेश्वर स्ट्रॉबेरी, नागपुरी संत्रा, भिवापुरी मिरची, बिडचे सीताफळ, मंगळवेढ्याची ज्वारी, वायगावची हळद, अलिबाग पांढरा कांदा, वाडा कोलम, सोलापूर डाळिंब, जालना मोसंबी, घोलवाड चिकू, वेंगुर्ला काजू, आंबेमोहर तांदूळ, नवापूर तूरडाळ, सांगली बेदाणा, लासलगाव कांदा यांचा समावेश आहे. यासाठी राज्य शासनाने खास जीआय कक्ष सुरू केला आहे. त्याद्वारे मानांकनासाठी मार्गदर्शन करण्यात येते.

याबरोबरच शेतमाल बाजार व्यवस्थेत ई-कॉमर्सचा वापर वाढावा म्हणून २०१६ मध्ये केंद्र शासनाने राष्ट्रीय कृषि बाजार (ई - नाम) योजना कार्यान्वित केली. यामुळे शेतकऱ्यांना इतर राज्यातील बाजार समित्यांमध्ये विक्रीचा पर्याय उपलब्ध झाला. तसेच राष्ट्रीय स्तरावरील ई-बाजारामुळे विक्रीबाबत स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत आहे. ई-नाममुळे शेतमालाची शास्त्रोक्त पध्दतीने गुणवत्ता तपासणी होते. यामुळे शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत आहे. राज्यातील ११८ बाजार समित्यांचा ई-नाम मध्ये समावेश आहे. कोव्हिडच्या काळात ई-कॉमर्सच्या वापरामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. यामध्ये खासगी कंपन्या सुध्दा मागे राहिलेल्या नाहीत. अनेक कंपन्यांनी शेतमालाच्या संकलनासाठी विविध ठिकाणी संकलन केंद्रे सुरु करुन शेतमाल संकलित करून त्यावर प्राथमिक प्रक्रिया करून ग्राहकांना शेतमाल घरपोच देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. २०१४-१५ नंतर राज्यात शेतकरी उत्पादक कंपन्या मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आल्या आहेत. त्याद्वारे शेतकऱ्यांना उत्पादित होणारा शेतमाल एकत्रितरित्या बाजारपेठेत पाठविणे सुकर झाले आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यास मदत होतआहे. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे आहे. राज्याच्या कृषी पणन व्यवस्थेमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झाला आहे. सद्यस्थितीत राज्यातील सर्व बाजारसमित्या इंटरनेटद्वारे जोडलेल्या आहेत. महाराष्ट्र कृषी पणन मंडळाने जून २०१७ मध्ये एमएसएएमबी या नावाने मोबाईल ॲप कार्यान्वित केले आहे. या ॲपद्वारे राज्यातील व इतर राज्यातील शेतमालाची आवक आणि बाजारभाव राज्यातील सर्व बाजार समित्यांची संक्षिप्त माहिती, कृषी पणन मंडळ राबवित असलेले विविध उपक्रम व योजनांची माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध होते.

कोरोनानंतर मागील तीन वर्षात शेतमालाच्या पणन व्यवस्थेत खूप मोठे बदल झाले आहेत. ग्राहकांना उत्तम प्रतीच्या शेतमालाची आवश्यकता आहे. उत्पादक सांगेल त्या किमतीस ग्राहक शेतमाल खरेदी करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना इंटरनेटच्या वेगाने धावण्याची गरज आहे. ग्राहकसुध्दा इंटरनेटच्या वेगाने धावतोय. कोव्हिडच्या प्रादुर्भावामुळे शेतमालाच्या विक्रीसाठी राज्यातील शेतकऱ्यांना एक चांगली संधी प्राप्त झाली आहे. त्या संधीचे सोने करण्याची गरज आहे. वैयक्तिक पातळीवर शेतकऱ्यांना शेतमालाच्या विक्रीमध्ये डिजिटलायझेशनचा वापर करणे जरी अवघड वाटत असले, तरी केंद्र राज्य शासनाच्या माध्यमातून निर्माण झालेल्या शेतकरी उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्यामार्फत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे सोपे झाले आहे. डिजिटलायझेशनच्या वापरामुळे शेतमालाचे काढणीपश्चात होणारे नुकसान कमी करणे शक्य झाले आहे. तसेच ग्राहकांची आवड विचारात घेऊन त्याप्रमाणे शेतमालाचे आकर्षक पॅकिंग तयार करून ग्राहकांपर्यंत पोहोच करणे सहज शक्य झाले आहे. ग्राहकांच्या मागणीप्रमाणे शेतमालाचा पुरवठा करीत असल्याने शेतमालाच्या उत्पादनाबाबत नियोजन करणे सोयीचे झाले आहे. राज्यातील मोठ्या शहरांमध्ये उत्पादक ते ग्राहक थेट विक्री अंतर्गत शेतकरी ऑनलाईन पेमेंट सुविधांचा वापर करीत आहेत. ग्राहकांसाठी शेतमालाचा उत्तम दर्जा, आकर्षित पॅकिंग व योग्य दर हे महत्त्वाचे घटक आहेत. डिजिटलायझेनच्या वापरामुळे शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावण्यास मदत होत आहे.

सद्यस्थितीत ग्राहक आरोग्याच्या बाबतीत जागरूक झाला आहे. त्यांना उत्तम प्रतीच्या शेतमालाची गरज आहे. या बाबींचा विचार करून शेतकऱ्यांनी सुद्धा क्युआर कोड सारख्या तंत्रज्ञानाचा शेतमालाच्या विक्रीमध्ये वापर सुरू केला आहे. क्युआर कोडच्या वापरामुळे ग्राहकांना शेतमालाच्या गुणवत्तेची हमी मिळत आहे. तर शेतकऱ्यांना सुध्दा जादा दर मिळण्यास मदत होत आहे. आजमितीस राज्यात हापूस आंबा, केशर आंबा, केळी व स्ट्रॉबेरी यासारख्या फळ पिकांमध्ये क्युआर कोडचा वापर शेतकऱ्यांनी सुरु केला आहे. यामुळे ग्राहक व उत्पादक हे थेट संपर्कात आले आहेत. राज्यात राज्य शासनाच्या वतीने जागतिक बँकेचा एमएसीपी प्रकल्प, आशियाई विकास बँकेचा मॅग्नेट प्रकल्प यासारख्या प्रकल्पांच्या माध्यमातून राज्यात शेतमालाचे मूल्यवर्धन करून विक्री करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# 'स्मार्ट' प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची जबाबदारी पणन मंडळावर

पुणे, दि. १ (प्रतिनिधी) - राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन म्हणजेच 'स्मार्ट' प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शेतीमाल निर्यातीच्या अनुषंगाने प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेची जबाबदारी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळावर देण्यात आली आहे.

पणन मंडळाकडून येणाऱ्या अहवालावर आधारित प्रस्तावित प्रकल्पाद्वारे निर्यात वृद्धीसाठी कोणत्या प्रकारच्या पायाभूत सुविधांची उभारणी आवश्यक आहे, ती निश्चित केली जाणार आहे. महाराष्ट्रातून फळे व भाजीपाल्याच्या निर्यात वाढीसाठी कोणकोणत्या पायाभूत सुविधांची गरज आहे व या सुविधा राज्यामध्ये कुठे असाव्यात, या अनुषंगाने जागतिक बँकेच्या सल्ल्याने हे कामकाज पणन मंडळाकडे देण्यात आले आहे. जागतिक व्यापार संघटनेची प्रमाणके व व्यापार विकास सुविधांमार्फत निर्यात वाढीसाठीच्या पायाभूत सुविधांबाबतचा आढावा घेण्यासाठी अभ्यास अहवाल पणन मंडळ तयार करणार असल्याची सांगून कार्यकारी संचालक दीपक शिंदे म्हणाले, या प्रकल्पाद्वारे उचित सेवा पुरवठादाराची नेमणूक करून आवश्यक सुविधांची उभारणी व संचलन करण्याचे नियोजन आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमधील मागणीनुसार गुणवत्तापूर्ण मालाचा पुरवठा करायचा असल्यास त्या त्या देशांमधील विविध मापदंड व उच्च प्रतिच्या गुणवत्तेसाठी प्रमाणिकरण करून देणे आवश्यक असते. जागतिक बँकेच्या सहकार्याने जागतिक व्यापार संघटनेमार्फत विकसित तंत्रज्ञानाचा वापर करून तंत्रशुद्ध पद्धतीने करण्यात येत असलेल्या अभ्यास अहवाल महत्त्वाचा आहे. त्याआधारे राज्यात कृषिमाल निर्यातीभिमुख सोयी-सुविधा उभ्या झाल्यास येथील शेतकऱ्यांच्या मालाच्या निर्यातीकरिता त्याचा वापर होऊन फायदा होणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

Samana Dt. 02/01/2023